**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२३१/२०२२**
**हात्या लसमा वसावे –विरुद्ध– ग्रुप ग्रामपंचायत ,सिंदुरी**
**मधील निशाणी क्र. ०१ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यू प्रमाणपत्र जारी करण्याचे ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय सिंदुरी, ता. अक्कलकुवा, जि. नंदूरबार यांना निर्देश मिळण्याकरिता दाखल करण्यात आला आहे.

०२) अर्ज प्राप्त झाल्यानंतर दिनांक ०७/११/२०२२ रोजीच्या दैनिक 'वार्ता' या वर्तमानपत्राद्वारे आक्षेप मागविण्यात आले होते. मात्र अर्जदाराच्या म्हणण्याबाबत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही.

०३) अर्जदाराने आपल्या म्हणण्याच्या पृष्ट्यर्थ खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावे सादर केले आहेत.

| अ.क्र. | दस्तऐवजाचे विवरण | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | अर्जदाराचे सरतपासणीचे शपथपत्र. | १२ |
| २. | अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. २ ठोग्या हिमडा वसावे याचे शपथपत्र. | १३ |
| ३. | कै. लछमा हिमडा वसावे याची मृत्यू नोंद नसल्याबाबतचा ग्रुप ग्रामपंचायत सिंदुरी,ता.अक्कलकुवा यांनी निर्गमित केलेला दाखला. | १४ |
| ४. | अर्जदार हात्या लसमा वसावे याच्या आधार कार्डची साक्षांकित प्रत. | १६ |
| ५. | दिनांक ०७/११/२०२२ रोजीच्या दैनिक 'वार्ता' या वर्तमानपत्रातील जाहीर नोटीसीची प्रत | ११ |
| ६. | अर्जदारतर्फे पुरावा बंद पुरसीस | १८ |

०४) अर्जदाराचे विधीज्ञ श्री सुरेश एच.वसावे यांचे युक्तिवाद ऐकले. तसेच अर्जदाराचे म्हणणे व त्याने सादर केलेले पुरावे विचारात घेतले. अर्जदाराने अर्जासोबत दाखल केलेल्या दस्तऐवज यादीसोबत गैरअर्जदार ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय सिंदुरी, ता.अक्कलकुवा यांचेकडील अर्जदाराच्या वडीलांची मृत्यू नोंद नसल्याबाबतचा दाखला निशाणी क्र. १४ कडे सादर केले असल्यामुळे गैरअर्जदाराचे म्हणणे मागविण्यात आले नाही.

०५)  अर्जदाराच्या म्हणण्यानुसार त्याचे वडील नामे ''लछमा हिमडा वसावे'' यांचा मृत्यू दिनांक ०७/०६/२००५ रोजी मौजे गमण पो. पिंपळखुंटा, ता. अक्कलकुवा येथे झाला, मात्र त्याची अद्याप नोंद घेण्यात आलेली नाही. शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याकरिता मृत्यू प्रमाणपत्र हे आवश्यक दस्तऐवज आहे. मात्र अर्जदाराच्या वडीलांच्या मृत्यूची नोंद घेण्यात आली नसल्यामुळे तसे प्रमाणपत्र जारी करण्याकरिता न्यायालयाच्या आदेशांची आवश्यकता आहे.

०६)  जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३(३) मधील तरतूदीनुसार जन्माची अथवा मृत्यूची नोंद एक वर्षाच्या आत करण्यात आली नसल्यास त्याबाबतचे निर्देश संबंधित प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घेणे बंधनकारक आहे. अभिलेखावरील सर्व बाबींचे अवलोकन करता अर्जदाराचे वडील 'लछमा हिमडा वसावे' याचा मृत्यू दिनांक ०७/०६/२००५ रोजी मौजे गमण, पो.पिंपळखुंटा, ता. अक्कलकुवा येथे झाला ही बाब नाकारण्याचे कोणतेही कारण नाही. तसेच अर्जदार व त्याच्या नातेवाईकांच्या चुकीमुळे सदर नोंद घेण्यात आली नव्हती असेही अभिलेखावरुन दिसते.

०७)  अशाप्रकारे एकंदरीत सर्व बाबींचे अवलोकन करता अर्जदाराच्या म्हणण्यावर अविश्वास ठेवण्याचे कोणतेही कारण अभिलेखावर नसल्याचे माझे मत बनते. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतात.

**आ दे श**

१} अर्ज मंजूर करण्यात येतो.

२} अर्जदाराकडून आवश्यक शुल्काचा भरणा करुन वडील **'लछमा हिमडा वसावे'** यांचा **मृत्यू** दिनांक ०७/०६/२००५ रोजी झाल्याची नोंद घेण्यात यावी आणि त्याबाबत 'मृत्यू प्रमाणपत्र' जारी करावे, असे आदेश संबंधित यंत्रणेस देण्यात यावेत.

३} प्रकरण दाखल दप्तर करण्यात येते.

Digitally signed by Vishwas Pandurang Shinde
Date: 2023.03.21 12:31:04 +0530

( **विश्वास पां. शिंदे** )
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, अक्कलकुवा
जिल्हा नंदूरबार.

ठिकाण :– अक्कलकुवा
दिनांक :– २०/०३/२०२३

## <u>दा ख ला</u>

दाखला देण्यात येतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ आदेशाप्रमाणेच आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :– | मयुर धर्मराज पाटील |
| न्यायालयाचे नाव | :– | दिवाणी व फौजदारी न्यायालय, अक्कलकुवा, ता. अक्कलकुवा, जि. नंदूरबार. |
| आदेश जाहीर केल्याची तारीख | :– | २०/०३/२०२३ |
| न्यायाधिशांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | :– | २०/०३/२०२३ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | :– | २१/०३/२०२३ |